# प्रकरण २ राष्ट्रीय सुरक्षा आव्हाने (बाह्य)

सोबतच्या भारताच्या नकाशाचे निरीक्षण करा.

भारताच्या शेजारील देश कोणते ते अभ्यासा. त्यांच्याशी असलेले भारताचे संबंध, पूर्व इतिहास आणि आज भारतासमोरील आव्हानांचा आपण विचार करणे गरजेचे आहे. भारताच्या शेजारी पश्चिमेस पाकिस्तान आणि उत्तरेस चीन हे देश आहेत. उत्तरेस भारताची सीमा अफगाणिस्तानलाही भिडली आहे. अफगाणिस्तानला भिडलेल्या या भारतीय सीमा भागास 'वाकन कॉरिडॉर' असेही म्हणतात.

या व्यतिरिक्त भारताच्या उत्तरेस नेपाळ, भूतान हे देश असून पूर्वेस बांग्लादेश व म्यानमारचा प्रदेश आहे. दक्षिणेस हिंदी महासागर क्षेत्रात श्रीलंका आहे.

## भारत व शेजारी देश



### ❍ पाकिस्तान :

भारत आणि पाकिस्तान यांच्यात १९४७ पासून अनेक युद्धे झालेली आहेत. पाकिस्तान सोबत १९४७-४८, १९६५ आणि १९७१ या प्रमुख युद्धांचा समावेश असून त्यापैकी पहिली दोन युद्धे मुख्यतः काश्मीर समस्येवरून झाली आहेत. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धातून बांग्लादेशाची स्वतंत्र राष्ट्र म्हणून निर्मिती झाली. त्यापूर्वी तो पूर्व पाकिस्तान म्हणून भारताच्या पूर्वेकडील पाकिस्तानचा प्रदेश होता. १९९९ मध्ये भारताला पुन्हा कारगिल भागात लढाई करावी लागली. पाकिस्तानसोबतची आजपर्यंतची युद्धे पारंपरिक स्वरूपाची म्हणून मर्यादित होती. भविष्यकालीन युद्धे कदाचित अण्वस्त्रांसह म्हणूनच व्यापक स्वरूपाची असू शकतील. म्हणजेच पाकिस्तानसोबतच्या युद्धांचे स्वरूप बदलते आहे.

अनेक दहशतवादी गटांनी पाकिस्तानमध्ये आश्रय घेतला आहे. भारतावर या दहशतवादी गटांचे हल्ले होत असतात. हे एक आव्हान आहे.

### ❍ चीन :

भारताच्या उत्तरेस चीन ही एक महत्त्वाची (राष्ट्र) सत्ता आहे. आंतरराष्ट्रीय सीमावाद व तिबेटचे स्थान हे भारत-चीन विवादाचे मूळ कारण आहे. अक्साई चीन आणि अरुणाचल प्रदेशाची(पूर्वीचा नेफा) उत्तर सीमा निश्चितीबाबत दोन विवाद क्षेत्रे या दोन्ही देशा-दरम्यानची आहेत. अरुणाचल प्रदेश 'नेफा' म्हणून ओळखला जात होता. उत्तरेकडील अक्साई चीन या लडाख मधील भारतीय प्रदेशावर चीनचा अवैध ताबा आहे. अरुणाचल प्रदेश व तिबेटदरम्यानची सीमा मॅकमहॉन रेषा म्हणून ओळखली जाते. १९१४ मध्ये शिमला येथे भारत, चीन व तिबेटी प्रतिनिधींच्या उपस्थितीत हेन्री मॅकमहॉन या ब्रिटिश अधिकाऱ्याने ही सीमारेषा भारत-चीन दरम्यानची आंतरराष्ट्रीय सीमा म्हणून निश्चित केली होती. १९६२ च्या भारत-चीन युद्धाचे मूळ कारण हा सीमावाद हेच होते.

पारंपरिकदृष्ट्या तिबेट हा स्वायत्त प्रदेश आहे. बौद्ध संस्कृती हे तिबेटचे वैशिष्ट्य आहे. १९५० पासून चीनने तिबेटवर आपला हक्क प्रस्थापित केला असून तेथील बौद्ध संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न चालवला आहे. तिबेटी जनतेवर चीनने चालवलेल्या अत्याचारांमुळे तिबेटचे प्रसिद्ध धार्मिक नेते दलाईलामा यांनी १९५८ मध्ये भारताचा आश्रय घेतला.

### ❍ बांग्लादेश :

१९७१ पूर्वी भारताच्या पश्चिमेस पश्चिम पाकिस्तान तर पूर्वेस पूर्व पाकिस्तान असे दोन पाकिस्तानी प्रदेश भारताच्या दोन बाजूंना होते. पूर्व पाकिस्तानात प्रचंड शोषण व मानवी हक्कांचे उल्लंघन पश्चिम पाकिस्तानने चालवले होते. यातूनच शेख मुजिबूर रेहमान यांच्या नेतृत्वात पूर्व पाकिस्तानी लोकांनी पश्चिम पाकिस्तानच्या जुलमी लष्करी राजवटीविरुद्ध बंड पुकारले. पश्चिम पाकिस्तानच्या या शोषणापासून स्वतंत्र होण्यासाठी पूर्व पाकिस्तानने पुकारलेला हा लढा होता. या लढ्यामुळे लाखो पूर्व पाकिस्तानी भारतात निर्वासित म्हणून आश्रयासाठी आले. त्यामुळे भारताच्या

अंतर्गत व्यवस्थेवर मोठा ताण पडला म्हणूनच भारताने पूर्व पाकिस्तानच्या प्रयत्नांना सहकार्य केले. यातूनच १९७१ च्या युद्‌धाची सुरुवात झाली आणि बांग्लादेशाची स्वतंत्र राष्ट्र म्हणून निर्मिती झाली.

१९७१ पासून भारत व बांग्लादेश या दोन्ही देशांनी आपले परस्परसंबंध चांगले ठेवले. पुढे गंगा नदीवरील फराक्का येथील धरणावरून तंटा निर्माण झाला. फराक्का तंटा म्हणून तो आजही परिचित आहे. बांग्लादेशात वाहणाऱ्या गंगा नदीचे पाणी त्यामुळे अडवले गेले अशी भूमिका बांग्लादेशाची होती. १९७८ मध्ये हा वाद फराक्का करारावरील दोन्ही देशांच्या स्वाक्षरीनंतर संपुष्टात आला.

### ❍ श्रीलंका :

भारताचे श्रीलंकेशी मैत्रीपूर्ण संबंध आहेत. तमीळ अल्पसंख्याक समस्येमुळे श्रीलंकेच्या उत्तरेकडील प्रदेशात अंतर्गत अस्थिरता होती. राजकीय स्वातंत्र्याची मागणी तमीळ अल्पसंख्याक करत होते. या स्वातंत्र्याच्या मागणीचे रूपांतर नंतर लष्करी कारवाईत झाले. १९८७ मध्ये तमीळ समस्या निराकरणासाठी भारत-श्रीलंका दरम्यान करार झाला आणि त्यानुसार भारताने श्रीलंका सरकारला सहकार्याबाबत विश्वास दिला. या समस्येमुळे निर्माण झालेली परिस्थिती नियंत्रणात आणून सुरक्षितता निर्माण करण्यासाठी भारताने शांतीसेना पाठवून श्रीलंकेला सहकार्य केले. भारताच्या वरील शेजारी देशांबरोबरच हिंदी महासागराचे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्व लक्षात घेणे गरजेचे आहे.


## सागरी क्षेत्र

### ❍ हिंदी महासागर :

भारताला सुमारे ७००० किमी. चा समुद्र किनारा लाभला आहे. हिंदी महासागर हे क्षेत्र जागतिक व्यापाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. या व्यापाराचा मुख्य मार्ग सुएझ कालव्यापासून मलक्काच्या सामुद्रधुनीपर्यंत आहे. या मार्गामध्ये भारताचे मध्यवर्ती स्थान आहे. तसेच अंदमान-निकोबार द्वीप समूहांना यामुळे महत्त्व प्राप्त होते.

डच, फ्रेंच, पोर्तुगीज व ब्रिटिश हे व्यापारासाठी समुद्र मार्गाने भारतात आले व त्यांनी आपल्या वसाहती येथे स्थापन केल्या होत्या. हिंदी महासागरात अमेरिका, रशिया व चीन व इतर देशांचा प्रभाव वाढत आहे. हे क्षेत्र नैसर्गिक साधन संपत्तीच्या दृष्टीने संपन्न आहे. यामुळे हिंदी महासागराची सुरक्षा हे भारतासमोरील एक महत्त्वाचे आव्हान आहे.

हिंदी महासागर नकाशा


भूमध्य समुद्र
आ शि या
इराणचे आखात
तांबडा समुद्र
अरबी समुद्र
भारत
बंगालचा उपसागर
एडनचे आखात
आ फ्रि का
श्रीलंका
मलाक्काची समुद्रधुनी
मालदिव
म ले शि या
इंडोनेशिया
मादागासकर
ऑ स्ट्रे लि या
हिंदी महासागर
कॅप ऑफ गुड होप
उ.
० १०००
किमी.
हिं दी म हा सा ग र

## उपक्रम

भारत व शेजारील देशासंबंधी वर्तमानपत्रांतून येणाऱ्या बातम्या, चित्रे यांचा संग्रह करा. येथे चिकटवा.

भारत व शेजारील देशासंबंधी वर्तमानपत्रातून येणाऱ्या बातम्या, चित्रे यांचा संग्रह करा. येथे चिकटवा.

7K4HJT